11:23:33 **स. फौ.ख .नं. ६३०/२०२४**

म. सरकार वि. अतुल अशोक जाधव

**निशाण नं. ७/क**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१</u>**

नाव – अंजिक्य आनंदा जाधव

वय –४० वर्षे

व्यवसाय – सध्या नेमणुक पन्हाळा पोलीस स्टेशन.

पत्ता – तळसंदे ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती डी. बी. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु,</u>**

१. मी कोडोली पोलीस स्टेशन येथे २०१८ ते सन २०२४ या कालावधीत कार्यरत होतो. दि. २१.०५.२०२४ रोजी कर्तव्यावर हजर असताना मी , कुंभार व किर्तीवर्धन असे कोडोली गावामध्ये पेट्रोलिंग करत असतेवेळी आम्ही मटण मार्केट शेजारी गेलो असताना तेथे एक इसम उघडयावर दारु पीत असल्याचे आम्हाला आढळून आले. त्यानंतर आम्ही आमची गाडी रस्त्याच्या कडेला लावून पायी चालत सदर ठिकाणी गेलो. त्या ठिकाणी एक इसम त्याचे समोर प्लॅस्टीकचा एक ग्लास व दारुची काचेची एक बाटली ती १८० मिलीची होती. त्यामध्ये अंदाजे ९० मिली दारु शिल्लक होती. सदर प्लॅस्टीकच्या ग्लासचा वास आंबट व उग्र असा येत होता. सदर इसमास आमची चाहूल लागताच त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आम्ही त्या इसमास पकडून त्याला नाव विचारले असता त्याने त्याचे नाव अतुल अशोक जाधव रा. कोडोली असे सांगितले. त्यानंतर त्याच्या समोर असलेला मुद्देमाल आम्ही तेथे उपस्थित दोन इसमांना बोलवून पंच म्हणून येण्याकरिता विचारणा केली असता, त्यांनी त्यास होकार दिला. पो. ना. किर्तीवर्धन सदर दोन पंचांचे समक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला व दोन पंचांचे समक्ष आरोपी याचेकडे सापडून आलेला मुद्देमाल जागीच नाश केला. त्यानंतर मी आरोपी याचे विरुद्ध आरोपी हा बेकायदेशीररित्या उघडयावर दारुचे सेवन करत असलेला आढळून आल्यामुळे मी त्याचे विरुद्ध कोडोली पोलीस

स्टेशन येथे तक्रार दाखल केली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद व प्रथमवर्दी तीच आहे. त्यावर माझ्या सहया आहेत. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि. ८ व नि. ९</u>** देण्यात येत आहे. जो व्यक्ती उघडयावर दारू पीत आढळून व त्याचे समक्ष एक प्लॅस्टीकचा ग्लास व दारुची बाटली आढळून आला त्याला पाहिल्यास मी ओळखू शकतो. सदर इसम आजरोजी न्यायालयात हजर आहे. सदर इसम हा मला त्या दिवशी त्याला तोंडातून दारुचा वास येत होता. तसेच तो नशेत होता.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. सचिन. एस. पाटील यांचे मार्फत सुरु,</u>**

२.आम्ही सरकारी वाहनाने पेट्रोलिंग करण्याकरिता गेलो होतो.(सदर प्रश्नाच्या अनषंगाने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी अशी हरकत नोंदविली की, Contradiction किंवा परस्पर विरोधी आरोपीस फिर्यादी किंवा साक्षीदारास विचारता येणार नाही. सदर साक्षीदाराने सरतपासात याबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही त्यामुळे तशा उल्लेखबाबत साक्षीदारास प्रश्न विचारून त्या गोष्टीकरिता पुन्हा आरोपी यांचे वकिलांना त्याबाबत Contradict करता येणार नाही. आरोपी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, फिर्यादीचे अवलोकन केले असता, वाहन रस्त्याच्या कडेला लावून सदर साक्षीदार पायी चालत गेलेला होता त्यामुळे सदर प्रश्न विचारण्याचा आरोपी यांना पुर्ण अधिकार आहे. तसेच सदर साक्षीदाराच्या सरतपासात आम्ही आमची गाडी रस्त्याच्या कडेला लावून पायी चालत सदर ठिकाणी गेलो हा शब्द प्रयोग दिसून येत आहे त्यामुळे सदरबाबत प्रश्न विचारण्याचा आरोपी यांना पुर्ण अधिकार आहे. दोन्ही सन्माननीय वकिलांच्या युक्तीवादाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता, सरतपासात सदर साक्षीदाराने आम्ही आमची गाडी रस्त्याच्या कडेला लावून पायी चालत सदर ठिकाणी गेलो अशी साक्ष दिलेली आहे त्यामुळे आरोपी यांनी विचारलेला प्रश्न Relevant आहे असे वाटते. सबब हरकत फेटाळण्यात येत आहे. )

३. हे म्हणणे खरे आहे की, सदर शासकीय वाहनाबाबतचा उल्लेख फिर्यादीमध्ये नमूद नाही. आम्ही पेट्रोलिंग करण्यास जाताना आम्ही हालचाल रजिस्टरला याबाबतची नोंद केली होती. हे म्हणणे

खरे आहे की, मी कथन केलेल्या घटनास्थळाच्या एक ते दोन मिनीटांच्या अंतरावर ग्रामीण रुग्णालय कोडोली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर आरोपीची मी अथवा माझे सोबत आलेल्या अन्य पोलीस कर्मचारी यांनी कोडोली पोलीस रुग्णालयात नेवून मेडिकल टेस्ट केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी कथन केलेले मटण मार्केट हे कोडोली येथील खाउ गल्लीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, रात्री कोडोलीतील लोक जेवण झाल्यानंतर सदर कथन केलेल्या ठिकाणी आईस्क्रीम खाण्यास वगैरे फिरण्यास जातात. हे म्हणणे खरे आहे की, मी कथन करत असलेल्या ठिकाणी आईस्क्रीम स्टॉल, कोल्ड्रींक्स व पाणीपुरी स्टॉल आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे सदर ठिकाणी कोल्ड्रींक्सच्या बाटल्या किंवा प्लॅस्टीकचे ग्लास पडलेले असतात. हे म्हणणे खरे नाही की, अशाच मजकुराच्या सारख्याच तक्रारी मी विविध आरोपी विरुद्ध दाखल केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दिवशी पेट्रोलिंगकरिता गेलो नव्हतो, आरोपी कडून आम्ही काहीही जप्त केलेले नाही, त्या दिवशी आम्ही कोणताही मुद्देमाल नाश केलेला नाही, केवळ वरिष्ठांच्या दबावामुळे सदरची खोटी फिर्याद मी आरोपीविरुद्ध दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

11:41:46

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/–

**(के.दि.काकतकर)**

दिनांक. ०७.०४.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,पन्हाळा